वाचले :-

१) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ६९

२) मा. स्थायी समिती कडील मंजूर ठराव क्र. ४०३१,दिनांक ०४/०९/२०१३

३) लेखा/१/कावि/७७०/२०१३ दि. १७/०९/२०१३

४) दिनांक १२/०८/२०१४ चा मंजूर प्रस्ताव

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी १८, लेखा विभाग,
क्र.लेखा/१अ/कावि/५६५/२०१४
दिनांक :- १२/०८/२०१४

**विषय :- वित्तिय अधिकार प्रदान करणेबाबत.**

**आदेश,**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये वित्तिय विभागांच्या कार्यालयीन कामकाजासाठी विभागप्रमुख यांच्या नियुक्त्या करणेत आलेल्या आहेत. सध्या सदरचे अधिकारांकडे प्रदान करणेत आलेले वित्तिय अधिकार मर्यादित असलेने व महानगरपालिकेचा वाढता व्याप व दिवसेंदिवस वाढत जाणा-या वस्तुंच्या किंमती विचारात घेता संदर्भिय वाचले क्र. २ अन्वये मा.स्थायी समितीने विभाग प्रमुखांच्या वित्तिय अधिकारात वाढ करणे व त्याचे एकत्रित आदेश निर्गत करणे बाबत मान्यता दिलेली आहे. त्यानुसार वाचले क्र. ३ अन्वये आदेश निर्गत करणेत आलेला आहे. तथापि प्रभाग अधिकारी यांचे कामकाजाचे सोयीसाठी व कामकाजात गतिमानता येणेसाठी काही वित्तीय अधिकारात वाढ करणे आवश्यक आहे.

सबब, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम ६९ अन्वये मी, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी यापूर्वी प्रभाग अधिकारी यांना प्रदान केलेले वित्तिय अधिकारात वाढ करुन सोबत प्रपत्र "अ" नमूद केलेप्रमाणे दिनांक १३/०८/२०१४ पासून वित्तिय अधिकार प्रदान करणेस प्रस्तुतच्या आदेशान्वये मान्यता देत आहे.

प्रस्तुतचे अधिकारामध्ये बदल करणे अथवा निरस्त करणे याबाबतचे हक्क मी स्वत:कडे राखून ठेवीत आहे.

सही/-
**आयुक्त,**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी १८

**प्रति :-**

विभागप्रमुख अ/ब/क/ड/ई/फ विभागीय कार्यालय

**प्रत :-** १) लेखा विभाग

२) मुख्यलेखापरिक्षण

३) संगणक प्रशासन,

**मुख्यलेखापाल**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

## पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८
## महापालिका अधिकारी यांची वित्तीय अधिकार
## प्रपत्र "अ"

(आदेश क्र. लेखा/१३/कावि/५६५/२०१४ दि. १२/८/२०१४ ...)

| पदनाम | वित्तीय अधिकाराचे स्वरुप | वाढीव अधिकाराचे स्वरुप |
|---|---|---|
| प्रभाग अधिकारी सर्व क्षेत्रीय कार्यालय अ,ब,क,ड,ई,फ | १) र.रु १०,००,०००/- कमाल मर्यादिपर्यंत खर्च अंतर्गत असलेल्या कामाचे संदर्भात निविदा मागविणे , निविदा स्विकारणे. व महानगरपालिकेच्या वतीने करारनाम्यांवर स्वाक्षरी करणे.<br>२) र.रु ५०,०००/- पर्यंतच्या कामासाठी कोटेशन काढणे, मंजुर करणे कामाचे आदेश देणे व बिल मंजुर करणे.<br>३) कार्यालयीन वापरासाठी र.रु १०,०००/- स्थायी अग्रीम धन बिल मंजुर करणे.<br>४) वाहन इंधनासाठी र. रु २०,०००/- मंजूर करणे. | र.रु १०,००,०००/- लाख कमाल मर्यादिपर्यंत खर्च अंतर्गत असलेल्या स्थापत्य, पाणीपुरवठा, विद्युत व आरोग्य विषयक कामांचे संदर्भात सक्षम समिती मार्फत प्रशासकीय मान्यता घेणेची कार्यवाही करणे व प्रशासकीय मान्यतेसाठी पाठवावयाचे विषय पत्रावर स्वाक्षरी करणे व निविदा मागविलेनंतर एक किंवा दोन निविदा उघडावयाच्या किंवा नाही या बाबत निर्णय घेणे. अनामत / बयाणा रक्कम जप्त करणे व दंडात्मक कारवाई करणे. |

आयुक्त, १२/८/१४
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी १८